# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 06/02/2023 (सोमवार) दुपार


### दुखापत

**पो.स्टे. खापरखेडा :–** अंतर्गत वलनी कॉलनी वार्ड नं. ०५ येथे दिनांक ०५/०२/२०२३ चे १७.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– पुनिश दादारावजी सोनेकर, वय ३८ वर्ष, रा. वलनी कॉलनी वार्ड नं. ०५ खापरखेडा व आरोपी नामे– १) परमेश्वर राजाराम सहारे २) रोहीत परमेश्वर सहारे दोन्ही रा. वलनी कॉलनी वार्ड नं. ०५ हे एकाच क्वार्टर मध्ये खाली वर राहत असुन आरोपी यांच्या घरी नेहमी ठोकपीट करण्याचा आवाज येत असल्याने फिर्यादीच्या भिंतीला भेगा पडलेल्या असुन छताचे पोपडे खाली पडतात त्यामुळे फिर्यादीने त्यांना २ ते ३ महिन्यापुर्वी समजावुन सांगितले कि ''तुमच्या घरी भिंतीला ठोकपिट नका करत जावु'' तेव्हा परमेश्वर सहारे यांची पत्नी सौ. अनिता सहारे यांनी फिर्यादीच्या आई सोबत वाद विवाद केला फिर्यादीच्या आईने फिर्यादीला सांगितले तेव्हा फिर्यादीने त्यांच्या विरूध्द पो. स्टे.ला रिपोर्ट देण्यास आले असता आरोपींनी फिर्यादीस म्हटले की ''तु आमच्या विरूध्द रिपोर्ट का दिली'' असे म्हणुन त्याचा मुलगा रोहित यांनी फिर्यादीस ढकल ढुकल करून शिवीगाळ केली व डोक्याला कोणत्या तरी वस्तुने मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपींविरुध्द कलम ३२४, ५०४, ३४ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपींना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक ब. नं. ३०११ श्रीकांत बोरकर पो.स्टे. खापरखेडा मो. नं. ९९२१७०९६९२ पोस्टे खापरखेडा हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. जलालखेडा :–** दिनांक ०४/०२/२०२३ चे १३.३० वा. चे सुमारास पो.स्टे. जलालखेडा हद्दीत फिर्यादी यांची १३ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही फिर्यादी व त्यांची पत्नी घरी हजर असता फिर्यादीची मुलगी ही सुध्दा घरी हजर होती तेव्हा मुलीने फिर्यादीचे पत्नीला म्हटले की ''मी कुन्तेश्वर नासरे यांचे घरी लहान मुलांचे कॉन्व्हेन्ट मध्ये गॅदरींगचा कार्यक्रम पाहायला जाते'' असे सांगुन ती घरुन निघुन गेली नंतर ती १६.३० वा. पर्यंत मुलगी घरी का आली नाही म्हणुन फिर्यादी हे मुलीला पाहण्याकरीता कॉन्व्हेन्ट मध्ये गेले परंतु ती तिथे दिसुन न आल्याने मुलीला गावात आजुबाजुला व नातेवाईकांकडे शोधले असता मिळुन आली नाही. फिर्यादी यांनी मुलगी घरी येण्याची वाट बघितली परंतु मुलगी घरी आली नसल्याने मुलीस कोणीतरी अज्ञात ईसमाने कशाचे तरी आमिष दाखवुन फुस लावुन पळवुन नेले असावे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मनोज शेंडे मो. नं.९६३७५७८७६३ करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**